# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-४६ दिनांक - १५/०२/२०२४

## अंमली पदार्थ बाळगणा-या महिला व पुरषास ताब्यात घेवुन त्यांचेकडुन एकुण ११,८४,४००/- रुपये किमतीचा अंमली पदार्थ ( एम.डी. मेफेड्रॉन व गर्द ब्राउन शुगर ) जप्त करण्यात तुळींज पोलीस ठाण्यास यश

दिनांक १३.०२.२०२४ रोजी तुळींज पोलीस ठाणेचे पोशि-१४०६५ सगळे यांना त्यांचे गुप्त बामतीदाराकरवी माहीती मिळली होती कि, साईप्रेरणा अपा. तुळींज मराठी शाळेजवळ नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर या ठिकाणी अंगात पांढरे रंगाचा शर्ट व पांढरे रंगाचा हाफ बरमुडा परिधान केलेला व डोकीस केस वाढलेला एक इसम व अंदाजे ६० वर्षे वयोगटातील अंगात पिवळ्या रंगाची ओढणी व पांढरे रंगाचा गाउन व त्यावर काळे पट्टे असलेली डोळ्याला चष्मा घातलेली महिला असे दोघेजण साईप्रेरणा अपा. इमारतीसमोर अंमली पदार्थाची विक्री करित आहेत, अशी माहिती प्राप्त झाल्याने सदरबाबत मा.सहायक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांना मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत आदेश प्राप्त करुन घेवुन तसेच सोबत पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेसह मिळालेल्या बातमीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी जावुन, सापळा रचुन साईप्रेरणा अपा. तुळींज नालासोपारा पुर्व या इमारतीसमोर उभे असलेल्या एक महिला व एक इसम नामे,

१) सौ. पौर्णिमा राजु राठोड वय- ६० वर्षे, रा. ०३ साई प्रेरणा अपार्टमेंट तुळींज नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर
२) २)बजरंग सुरेश कसबे वय २४ वर्षे रा. रुम नं. ०३ साईप्रेरणा अपार्टमेंट तुळींज नालासोपारा पुर्व ता. वसई जि.पालघर

यांची अंगझडती घेतली असता, महिलेच्या अंगझडतीमध्ये एकूण ६,००,०००/- रुपये किमतीचा ६० ग्रॅम वजनाचा एम.डी.(मेफेड्रॉन) नावाचा अंमली पदार्थ तसेच पुरुष इसमाचे अंगझडतीमध्ये ५,५०,०००/- रुपये किंमतीचा ५५ ग्रॅम वजनाचा एम.डी.(मेफेड्रॉन) नावाचा अंमली पदार्थ व ३४,४००/- रुपये किंमतीचा ३.४४० ग्रॅम वजनाचा गर्द (ब्राउन शुगर) नावाचा अंमली पदार्थ असा एकुण **११,८४,४००/-** रूपयांचा अंमली पदार्थ मिळून आला असुन, नमुद आरोपीत यांचेविरूध्द तुळींज पोलीस ठाणे गु.रजी. नं. १३५/२०२४ गुंगीकारक औषधीद्रव्य आणि मनोवैद्यानिक परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ (एनडीपीएस ॲक्ट) कलम ८ (क), २१ (क) २९ प्रमाणे गुन्हा नोंद करून त्यांना अटक करण्यात आली आहे. जप्त मुददेमाल कोठुन खरेदी केला, याबाबत आरोपीत यांचेकडे चौकशी केली असता, सदरचा मुददेमाल अंकुश गवा रा. नालासोपारा याचेकडुन खरेदी केल्याचे निष्पन्न झाले आहे. अटक महिला आरोपीत ही सराईत अंमली पदार्थ तस्कर तसेच रेकॉर्डवरिल हिस्ट्रीशिटर गुन्हेगार असुन, तिचेविरुद्ध यापुर्वी २ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगीरी श्रीमती पौर्णिमा चौगुले श्रींगी पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री. उमेश माने-पाटील सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर,यांचे मार्गदर्शनाखाली स.पो.नि.एम.डी. म्हात्रे, पो.हवा. केंद्रे, वरठा, शेजवळ, म.पो.हवा. शुभांगी जाधव, पो.अं. कदम, सगळे, राजगे यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.